**<u>ठळक बातम्या</u>**

- युवकांची निष्ठा हेच विकसित भारताचं सामर्थ्य असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं मन की बात मधे प्रतिपादन

- राज्यातल्या २४३ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकीचा प्रचार संपायला २ दिवस शिल्लक असल्यानं प्रचार जोरात

- राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी स्वीकारला पदभार

**आणि**

- नॅशनल हेराल्ड प्रकरणी काँग्रेस नेते सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्या विरोधात दिल्ली पोलिसांनी केला एफआयआर

**<><><><><>**

युवकांची निष्ठा हेच विकसित भारताचं सामर्थ्य असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्र्यांनी आज आकाशवाणीवर मन की बात च्या माध्यमातून देशवासियांशी संवाद साधला. तीव्र इच्छा, सामूहिक शक्ती, आणि संघभावनेनं काम करण्यावर विश्वास असेल तर कठीण कामातही यश मिळतं असं ते म्हणाले. या संदर्भात त्यांनी इस्त्रोनं मंगळ ग्रहासारख्या वातावरणात जीपीएस प्रणालीशिवाय ड्रोन उडवण्याच्या स्पर्धेची चित्रफित पाहिल्याचा अनुभव सामायिक केला. या स्पर्धेत पुण्यातल्या एका संघानं यश मिळवल्याचा उल्लेख त्यांनी केला.

हैदराबाद इथं विमानांच्या देखभाल, दुरुस्ती आणि संपूर्ण तपासणी केंद्राचं उद्घाटन, नौदलाच्या ताफ्यात स्वदेशनिर्मित आयएनएस माहे या युद्धनौकेचा झालेला समावेशाचा उल्लेखही त्यांनी केला.

कृषी क्षेत्रातली देशाची प्रगतीही त्यांनी श्रोत्यांशी सामायिक केली. देशानं ३५७ दशलक्ष टन इतक्या प्रमाणात अन्नधान्याचं उत्पादन करून ऐतिहासिक विक्रम केला असल्याचं ते म्हणाले.

गेल्या काही वर्षांत मधाची निर्यात तीन पटीपेक्षा जास्त झाली आहे, देशाचं मध उत्पादन दीड लाख टनांपेक्षा जास्त झालं आहे, मध अभियानाअंतर्गत खादी ग्रामोद्योगानं सव्वा दोन लाखापेक्षा जास्त मधमाशी पालन पेट्यांचं वाटप केलं आहे अशी माहिती त्यांनी दिली.

क्रीडा क्षेत्रातल्या यशाचा उल्लेखही त्यांनी केला. महिला कबड्डी विश्वचषक स्पर्धेचं जेतेपद ,जपानमधल्या डेफ ऑलिम्पिक, तसंच जागतिक मुष्टीयुद्ध चषक स्पर्धेत भारतानं मिळवलेलं यश याविषयी त्यांनी सांगितलं. दृष्टीहीन महिलांनी जिंकलेला पहिलाच टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक म्हणजे देशाच्या क्रीडा इतिहासातल्या सर्वात मोठ्या यशांपैकी एक आहे असं ते म्हणाले.

**होल्ड बाईट - MKB BLIND WOMEN WORLD CUP**

प्रधानमंत्र्यांनी देशाचा गौरव वाढवणाऱ्या सांस्कृतिक आणि इतर घडामोडींचाही उल्लेख केला. काही दिवसांपूर्वीच साजरा झालेला संविधान दिन, तसंच वंदे मातरम् या गीताला दीडशे वर्षे पूर्ण होत असल्याबद्दल देशभरात होत असलेले कार्यक्रम, अयोध्येत राम मंदिरावर धर्मध्वजाचं आरोहण, कुरुक्षेत्रातल्या पांचजन्य स्मारकाचं लोकार्पण यांविषयी त्यांनी सांगितलं. आंतरराष्ट्रीय गीता महोत्सवानिमित्तानं विविध देशांत झालेल्या कार्यक्रमांची माहिती त्यांनी दिली.

राष्ट्रीय संग्रहालयातले भगवान बुद्धांचे पवित्र अवशेषांचं भूतान, रशियासह, मंगोलिया, व्हिएतनाम आणि थायलंड अशा अनेक देशांमध्ये प्रदर्शित केले जात असल्याचा उल्लेख त्यांनी केला. नुकत्याच झालेल्या जी ट्वेंटी परिषदेच्या निमित्तानंही आपण जागतिक नेत्यांना दिलेल्या भेटवस्तूंमध्ये स्थानिक भावनेवरच भर दिला असं ते म्हणाले. आगामी ख्रिसमस आणि नवीन वर्षाच्या खरेदीसाठीही नागरिकांनी देशात बनलेल्या वस्तुंची खरेदी करावी असं आवाहन त्यांनी केलं.

देशाच्या हिवाळी पर्यटन क्षमतांबद्दल सांगिताना. हिवाळी पर्यटनासाठी हिमालयातील डोंगररांगाचा विचार करावा असं आवाहन त्यांनी केलं.

**<><><><><>**

संसदेचं हिवाळी अधिवेशन उद्यापासून सुरु होत आहे. त्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारनं आज सकाळी सर्वपक्षीय बैठक घेतली. संरक्षण मंत्री राजनाथ सिंग बैठकीच्या

अध्यक्षस्थानी होते. राज्यसभेतले सभागृह नेते जे पी नड्डा, संसदीय कार्य मंत्री किरेन रिजिजू आणि राज्यमंत्री अर्जुनराम मेघवाल आणि डॉ. एल मुरुगन बैठकीला उपस्थित होते. कांग्रेसचे गौरव गोगोई, शिवसेनेचे नरेश म्हस्के, द्रमुकचे तिरुचि शिवा, तृणमूलचे डेरेक ओब्रायन, इत्यादी नेते बैठकीत सहभागी झाले होते. बैठक सकारात्मक वातावरणात झाल्याचं संसदीय कार्य मंत्री किरेन रिजिजू यांनी सांगितलं. या अधिवेशनात मतदार पुनरिक्षण, दिल्ली बॉम्बस्फोट तसंच परराष्ट्र संबधांबद्दल विरोधी पक्ष प्रश्न उपस्थित करतील अशी शक्यता आहे.

उद्यापासून सुरु होणारं हे अधिवेशन येत्या १९ डिसेंबरपर्यंत चालेल.

**<><><><><>**

राज्यातल्या २४३ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकीचा प्रचार संपायला २ दिवस शिल्लक आहेत. त्यामुळं राज्यभरात सर्वपक्षीय नेते आणि कार्यकर्ते आपापल्या उमेदवारांचा प्रचार करत आहेत. तसंच प्रशासनाकडून २ डिसेंबरला होणाऱ्या मतदानाची तयारी सुरू असून काही ठिकाणी टपाली मतदानाला सुरुवात होत आहे.

**याविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून...**

*(बीड जिल्ह्यातल्या सहा नगरपालिकांच्या निवडणुकीची तयारी पूर्ण झाली आहे. जिल्ह्यातल्या बीड, गेवराई, माजलगाव, धारूर, परळी आणि अंबाजोगाई या सहा नगरपरिषदांमधे दोन तारखेला मतदान होणार आहे. यासाठी जिल्हाभरात एकूण ४३४ मतदान केंद्र उभारण्यात आले आहेत. यात सर्वाधिक म्हणजे १७९ मतदान केंद्र बीड शहरात आहेत. जिल्ह्यातल्या सर्व मतदान केंद्रावर सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे. दरम्यान, भाजपा उमेदवारांच्या प्रचारासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सभा उद्या बीडमध्ये होणार आहे.*

*नंदुरबार जिल्ह्यातल्या चार नगरपरिषदांमधे टपाली मतदानाला सुरुवात झाली आहे. निवडणूक प्रक्रियेत कार्यरत असलेले ७३३ कर्मचारी आपला मतदानाचा हक्क बजावत आहेत.*

*नांदेड जिल्ह्यातल्या मुखेड आणि धर्माबाद नगरपरिषदा तसंच भोकर, लोहा आणि कुंडलवाडी नगरपरिषदांमधल्या तीन प्रभागांमधली निवडणूक प्रक्रिया नगराध्यक्षपदासाठी*

*अपील असल्यामुळे पुढे ढकलण्यात आली असून या ठिकाणी २ डिसेंबर ऐवजी २० डिसेंबरला मतदान होणार आहे.)*

**<><><><><>**

राज्याचे मुख्यसचिव म्हणून आज राजेश अग्रवाल यांनी आज कार्यभार स्वीकारला. ते १९८९च्या आयएस सेवेतले महाराष्ट्र केडरचे अधिकारी आहेत.

**<><><><><>**

एनडीए अर्थात राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या १४९ व्या तुकडीचं दीक्षांत संचलन पुण्यात खडकवासला इथं आज सकाळी झालं. कॅडेट सिद्धार्थ सिंग यांनी या संचलनाचं नेतृत्व केलं. याप्रसंगी ३२९ कॅडेट्स संरक्षण दलात दाखल झाले. नौदल प्रमुख ऍडमिरल दिनेश त्रिपाठी यांनी या संचलनाचं निरीक्षण केलं. याप्रसंगी कॅडेट दीपक कांडपाल यांना सुवर्णपदक, सिद्धार्थ सिंग यांना रौप्य पदक तर सिद्धी जैन यांना कांस्यपदक प्रदान कऱण्यात आलं.

या तुकडीतल्या ३२८ कॅडेट्सना जवाहरलाल नेहरू विद्यापीठाची पदवी मिळाली. ७२ जणांना विज्ञान, ९२ जणांना कॉम्प्युटर सायन्स, आणि ५२ जणांना कला शाखेतली पदवी प्रदान करण्यात आली.

**<><><><><>**

नॅशनल हेराल्ड प्रकरणी काँग्रेस नेते सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्या विरोधात दिल्ली पोलिसांनी एफआयआर दाखल केला आहे. मनी लॉंडरिंग प्रकरणात सक्तवसुली संचालनालयाने केलेल्या तक्रारीवरुन दिल्ली पोलिसांच्या आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखेने हा एफआयआर नोंदवला आहे. काँग्रेसचे अन्य नेते सुमन दुबे, सॅम पित्रोदा यांच्यासह एकूण ९ जणांविरुद्ध  कारवाई करण्यात येत आहे. ही कारवाई खोडसाळपणाची असून केवळ काँग्रेस नेत्यांना अडचणीत आणण्यासाठी केली जात असल्याची टीका पक्षाचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी केली आहे.

**<><><><><>**

मतदारयाद्या पुनरिक्षणाची मुदत केंद्रीय आयोगाने आठवडाभराने वाढवली आहे. ९ राज्य आणि ३ केंद्रशासित प्रदेशांमधे सध्या ही प्रक्रीया सुरु आहे. सुधारित अधिसूचनेनुसार

मतदारयादीत नाव नोंदणीसाठी ११ डिसेंबरपर्यंत अर्ज करता येईल. प्रारूप मतदार याद्या १६ डिसेंबरला प्रसिद्ध होतील. पुढच्या वर्षी १४ फेब्रुवारीला अंतिम मतदारयाद्या प्रसिद्ध होतील.

<><><><>

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातल्या तीन एकदिवसीय क्रिकेट सामन्यांच्या मालिकेला आजपासून प्रारंभ झाला.  या मालिकेतला पहिला सामना आज झारखंडमध्ये रांची इथं सुरु आहे.

या सामन्यात नाणेफेक जिंकून दक्षिण आफ्रीकेनं प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. पहिली फलंदाजी करताना भारताचा सलामीवीर यशस्वी जयस्वाल केवळ १८ धावांवर बाद झाला. मात्र त्यानंतर रोहीत शर्मा आणि विराट कोहली यांनी धडाकेबाज १३६ धावांची भागिदारी करत भारताचा डाव सावरला. या दोघांनीही वैयक्तिक अर्धशतकं पूर्ण केली. रोहीत शर्मा ५७ धावा करून बाद झाला.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या २२ व्या षटकात १ बाद १६१ धावा झाल्या होत्या.

<><><><>

चीनमध्ये चेंगडू इथं आजपासून आयटीटीएफ मिश्र सांघिक विश्व चषक स्पर्धेला सुरुवात होत आहे. या सामन्यांसाठी भारताच्या आठ टेबलटेनिस खेळाडूंच्या संघाचं नेतृत्व मनिका बत्रा आणि मानव ठक्कर करणार आहेत. मनिका आणि मानव राष्ट्रकुल स्पर्धेचे विजेते आहेत. भारतीय संघात  ऑलिंपियन साथिया ज्ञानसेकरनचासुद्धा समावेश आहे.

<><><><>

दितवा चक्रीवादळ आता उत्तर तमिळनाडू, पुद्दुचेरी आणि आंध्र प्रदेश किनारपट्टीकडे सरकण्याची शक्यता आहे. त्यामुळे तामिळनाडू आणि पुदुच्चेरी किनाऱ्यावर सतर्क राहण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.  विदर्भात आज तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे.

दरम्यान या वादळामुळे श्रीलंकेत आलेल्या पूर आणि भूस्खलनात मृतांची संख्या १५९ झाली असून २०३ जण अद्याप बेपत्ता आहेत. बचावकार्यात भारताच्या पथकांचा समावेश आहे.

**<><><><><>**

नांदेड जिल्ह्याच्या नायगाव तालुक्यात असलेल्या कृष्णूर एमआयडीसीतल्या कामगारांवर काल बिबट्याने केलेल्या हल्ल्यात एक कामगार जखमी झाला. त्यानंतर या बिबट्याच्या शोधात निघालेल्या वनविभागाच्या कामगारावरही बिबट्यानं हल्ला चढवला आहे. या परिसरात बिबट्यामुळे भितीचं वातावरण असून नागरिकांनी सतर्कता बाळगावी असं आवाहन करण्यात आलं आहे. बिबट्याला पकडण्यासाठी सापळे, कॅमेरे आणि पिंजरेही लावण्यात आले आहेत.

**<><><><><>**

भारतीय हॉकी संघानं सुलतान अजलनशाह चषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. आज होणाऱ्या अंतिम सामन्यात भारताची लढत बेल्जियमशी होणार आहे.

**<><><><><>**

सय्यद मोदी आंतरराष्ट्रीय सुपर 300 बॅडमिंटनचा अंतिम फेरीचा सामना आज लखनौ इथं बाबू बनारसीदास इनडोअर स्टेडियम इथे होईल. अंतिम फेरीत भारताचा बॅडमिंटनपटू किदंबी श्रीकांत आणि हाँगकाँगचा जेसन गुनावन यांच्यामध्ये सामना रंगेल. महिला दुहेरीत गायत्री गोपीचंद आणि ट्रीसा जॉली यांची लढत जपानच्या कोहो ओसावा आणि माई तानाबे यांच्याबरोबर होईल.

**//<><><><><>//**